

# भारतीय कार्यस्थलों वर घरगुती हिंसेचे परिणाम

# कार्यकारी सारांश

## कार्यकारी सारांश

भारतातील विविध क्षेत्रातील महिला कर्मचार्यांवर घरगुती हिंसाचार कशा प्रकारे दुष्परिणाम करतो याचा अभूतपूर्व दृष्टीकोन हा अहवाल प्रस्तुत करतो. ऑक्टोबर २०१९ ते मे २०२० दरम्यान संपूर्ण भारतातील १५ वर्षे किंवा अधिक वयोगटातील १५,५६१ कामगारांशी संलग्न, ज्यातील ९८% महिला आहेत, संकलित सर्वेक्षण माहितीवर हा आधारित आहे. या सर्वेक्षणात घरगुती हिंसाचाराशी संलग्न कामगारांच्या अनुभवांचे अन्वेषण केले आणि अशा प्रकारच्या घरगुती हिंसाचाराचा अनुभव असणार्यांच्या बाबतीत , या अनुभवांचा त्यांच्या कामावरील दुष्परिणाम, त्यांचे सह-कामगार आणि त्यांना मिळालेल्या आधाराचे अधिक अध्ययन करण्यात आले. भारतात कार्यस्थळावर घरगुती हिंसाचाराच्या दुष्परिणामांचे सर्वसमर्पक अन्वेषण करणारे हे पहिले सर्वेक्षण आहे.

या अध्ययनासाठी, घरगुती हिंसाचाराची व्याख्या म्हणजे कोणत्याही प्रकारचे शारिरीक, लैंगिक, मौखिक, सांस्कृतिक, अध्यात्मिक,भावनात्मक किंवा मानसिक गैरवर्तन, ज्यात आर्थिक नियंत्रण, दुर्लक्ष, धमकी किंवा छळणूक जी भूतकाळातील किंवा वर्तमानातील विरुध्द किंवा समान लिंगाच्या सहभागिदारांमध्ये घडते, जे विवाहित असू किंवा नसू शकतील, सामान्य सामाजिक नियमांने बाध्य असतील किंवा नसतील किंवा एकत्र राहत असतील किंवा नसतील.

हे मूलभूत अध्ययन आयटीएफ संलग्न व्यक्ती, इतर भारतीय संघटना आणि लिंग-आधारित हिंसाचारांवर काम करणार्या इतर संस्थांद्वारा करण्यात आले. हे अध्ययन वेस्टर्न युनिव्हर्सिटीच्या सेंटर फॉर रिसर्च ॲंड एज्युकेशन (सीआरएव्हीएडब्ल्युसी) यांसह डोमेस्टिक व्हायोलन्स ॲट वर्क नेटवर्क ॲन्ड द इंटरनॅशनल ट्रान्स्पोर्ट्स वर्कर्स

फेडरेशन(आयटीएफ) यांच्या समर्थनाने करण्यात आले.

## घरगुती हिंसाचार हा कार्यस्थळाशी संबंधित मुद्दा आहे

वाहतूक व्यवसायात कार्यरत लक्षणीय संख्येतील महिलांसाठी घरगुती हिंसाचार ही एक मोठी समस्या आहे हे यातील संशोधने नि:संशय प्रस्तुत करतात.

**७५%** जणींनी त्यांच्या **संपूर्ण आयुष्यभरात प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष घरगुती** हिंसाचाराच्या **अनुभवांबद्दल** सांगितले.

**४७%** जणींनी त्यांच्या **संपूर्ण आयुष्यभरात प्रत्यक्ष घरगुती** हिंसाचाराच्या **अनुभवांबद्दल** सांगितले.

**२४%** जणींनी **गत १२ महिन्यांत प्रत्यक्ष घरगुती** हिंसाचाराच्या अनुभवांबद्दल सांगितले.

**२५%** जणींनी **कामावर असणार्या त्यांना माहित असणार्या** कोणालातरी घरगुती हिंसाचारास तोंड द्यावे लागले असे संगितले.

हे प्रतिसाद नि:संशयपणे सिध्द करतात की घरगुती हिंसाचार कार्यस्थळापर्यंत पोहोचतो. घरगुती हिंसाचाराच्या अनुभवाबद्दल सांगणार्या प्रचंड मोठ्या प्रमाणातील (९२%) कामगारांनी असे सांगितले की त्याचा परिणाम त्यांच्या कामावर कोणत्या ना कोणत्या प्रकारे करतो हे निश्चित आहे. हे कामगार **आपण विचलित असल्याचे, थकलेले, अस्वस्थ किंवा आपणास इजा झाल्याचे स्पष्टपणे** सांगतात. प्रतिसादकर्त्यांनी हे देखील सांगितले की घरगुती हिंसाचारामुळे त्यांना **कामावर जाण्यास उशीर होतो** किंवा त्यांना **कामावर पूर्णत: अनुपस्थितच रहावे लागते**.

या संशोधनांद्वारे हे देखील उघड झाले की घरगुती हिंसाचाराचा थेट अनुभव करणार्या व्यक्तींपर्यंतच याचे दुष्परिणाम थांबत्त नाहीत. घरगुती हिंसाचाराचा अनुभव घेणार्या कोणाबरोबर तरी काम करणार्या सहकार्यांच्या बाबतीत, अनेक जण त्या परिस्थितीच्या संबंधी **तणावात होते** , त्यातील एक तृतियांश जणांना **आपल्या कामाचा भार वाढत असल्याचे जाणवले** आणि ३०% टक्के जणांना स्वत:स नुकसान पोहोचत आहे किंवा धमकावण्यात येत आहे असे वाटले.

त्यांचे काम किंवा त्यांच्या कार्यस्थळापर्यंत या घरगुती हिंसाचाराच्या अनुभवांचे पडसाद कशा प्रकारे पोहोचतात हे सुध्दा हे संशोधन उघड करते. सुरक्षित कार्यस्थळाची खात्री करून घेण्याची इच्छा असणार्या नियोक्त्यांपुढे हे संशोधन एक आव्हान ठेवते.

**७२%** जणींनी कामावर असतांना शिवराळ फोन कॉल्स किंवा टेक्स्ट संदेश येत असल्याचे सांगितले.

**२२%** टक्के जणींनी, शिवराळ/गैरफायदा घेणारी व्यक्ती प्रत्यक्षपणे त्यांच्या कार्यस्थळावर येण्याचे सांगितले.

**४२%** जणीनी त्यांना शिविगाळ करणार्या/गैरफायदा घेणार्या व्यक्तीच्याच कार्यस्थळावर काम करत असल्याचे सांगितले.

घरगुती हिंसाचार अनुभवलेल्या दोन तृतियांशपेक्षा अधिक व्यक्तींनी, कामावर असणार्या कोणाशी तरी या बद्दल चर्चा केल्याचे सांगितले. प्रतिसादकर्त्यांपैकी धक्कादायक संख्येतील बहुसंख्य जणींनी उघड केले की त्यांनी भेदभाव अनुभवला आहे किंवा त्यांना भोगाव्या लागणार्या घरगुती हिंसाचाराच्या अनुभवांबद्दल त्यांनी सांगितले तर त्या इतर प्रकारचा हिंसाचार किंवा छळणुकीचे भक्ष्य बनतील असे त्यांना वाटते. घरगुती हिंसाचाराच्या अनुभवांमुळे जवळ

जवळ एक चतुर्थांश (२३%) प्रतिसादकर्त्यांना **त्यांच्या नोकर्या गमवाव्या लागल्याचे** त्यांनी सांगितले.

घरगुती हिंसाचाराच्या त्यांच्या अनुभवांवद्दल चर्चा केल्यानंतर त्यांच्या नियोक्त्यांकडून भेदभाव किंवा नकारात्मक वा विपरित अनुभव आल्याचे **७७ %** जणींनी सांगितले.

**७०%** टक्के जणींनी सांगितले की त्यांचा घरगुती हिंसाचाराचा अनुभव त्यांना कार्यस्थळावरील इतर प्रकारचा हिंसाचार किंवा छळणूक यांच्या साठी **त्यांना अधिक असुरक्षित** बनवतो.

सर्वेक्षणास मिळालेले प्रतिसाद हे दाखवतात की बहुतांश प्रतिसादकर्ते (७३.८%) हे मानतात की कार्यस्थळावरील सवेतन सुट्टी, प्रशिक्षण व शिक्षण आणि घरगुती हिंसाचाराविरुध्द सुरक्षितता धोरणे या सारखे उपाय, कामगारांच्या कार्यजीवनावरील घरगुती हिंसाचाराचे दुष्परिणाम कमी करू शकतात. तथापि, हिंसाचार प्रतिबंध आणि सुरक्षित कार्यस्थळ, व यांना समर्थन देणारे विधीनियम आणि धोरणे या दोन्हीतील विसंगती ही संशोधने ठळक करतात,ज्या नुसार घरगुती हिंसाचारास तोंड द्याव्या लागणार्या ७०% जणींना रजा (अवेतन देखील) **नाकारण्यात आली होती.**

घरगुती हिंसाचारास तोंड देत असलेल्या कामगारांना, कंपन्या, संघटना आणि सरकार, सर्वात उत्तम प्रकारे कशा प्रकारे समर्थन करू शकेल या बद्दल चिंतन करण्यास विचारण्यात आले तेव्हा प्रतिसादकर्ते म्हणाले की कंपन्यांनी सवेतन रजा दिली पाहिजे (७८.५%), वुमेन्स ॲडव्होकेट प्रोग्रॅम्स सारखे सहकारी समर्थन कार्यक्रम संघटनांनी उपलब्ध केले पाहिजेत (७२.८%) आणि घरगुती हिंसाचारास आळा घालण्यासाठी व त्यांची दखल घेण्यासाठी सरकारने नियम लागू केले पाहिजेत(८७.२%).

## एक सामूहिक आव्हान या नात्याने घरगुती हिंसाचाराचे निर्मूलन

विविध प्रकारचा भारतीय कामगार आणि त्यांचे कार्यस्थळ यांवर घरगुती हिंसाचाराचा दुष्परिणाम याची दखल या संशोधनाद्वारे घेतली आहे परंतु ही केवळ पहिली पायरी आहे. घरगुती हिंसाचाराचा कामावर होणार्या दुष्परिणामांची दखल घेण्यासाठी सरकार, नियोक्ते, संघटना आणि समाज संस्थांनी प्रतिबंधक प्रथां प्रस्थापित करणे अनिवार्य आहे. घरगुती हिंसाचाराचे निर्मूलन करणे ही सामूहिक जबाबदारी आहे.

घरगुती हिंसाचार्याच्या लढ्यात कार्यस्थळाचे महत्त्व, न्यूझीलंड, ऑस्ट्रेलिया आणि द फिलिपाइन्स सारखी जगातील सरकारे आता ओळखू लागली आहेत व घरगुती गैरफायद्यांच्या प्रकरणांत अतिरिक्त नियुक्ती अधिकार देणारी राष्ट्रीय संविधाने संमत करू लागली आहेत. अशा प्रकारचे नियम भारत सरकारने प्रभावीपणे लागू करणे गरजेचे आहे असे ८७% प्रतिसादकर्त्यांनी व्यक्त केले आहे असे या अहवालातील संशोधने दर्शवतात.

हे अत्यंत महत्त्वाचे आहे की भारत सरकारने कायदा सुधारणेच्या दिशेने काम केले पाहिजे ज्यात प्रोटेक्शन ऑफ वुमेन फ्रॉम डोमेस्टिक व्हॉयलन्स ॲक्ट(पी डब्ल्यु डी व्ही ए) २००५ आणि सेक्श्युअल हरॅसमेंट ऑफ वुमेन ॲट वर्कप्लेस (प्रिव्हेन्शन, प्रॉहिबिशन ॲन्ड रिड्रेसल) ॲक्ट(एसएचडब्ल्युपी)२०१३ समाविष्ट आहेत. घरगुती हिंसाचार ही कार्यस्थळावरील समस्या आहे हे मान्य करणे, कन्व्हेन्शन सी १९० व रेकमेंडेशन २०६ मध्ये सुधारणा/दुरुस्ती करणे आणि कोविद-१९ प्रतिसाद धोरणांत घरगुती हिंसाचार आधार समाविष्ट करणे ही देखील पुढील सकारात्मक पाऊले होऊ शकतील जी सर्वसामान्य जनतेस नि:संदेह सूचित करेल की घरगुती हिंसाचार हा खाजगी मामला नसून याचे दुष्परिणाम कार्यस्थळ व संपूर्ण समाजावर होतात.

सुरक्षित कार्यस्थळ ही नियोक्त्याची जबाबदारी आहे हे नियोक्त्यांनी स्वीकारणे अत्यंत महत्त्वाचे आहे.कामगारांना घरी हिंसाचारास तोंड द्यावे लागते तेव्हा त्याचे दुष्परिणाम कार्यस्थळावर जाणवतात. कार्यस्थळावर होणार्या घरगुती हिंसाचाराच्या दुष्परिणामांची तीव्रता कमी करण्याची जबाबदारी नियोक्त्यांनी आपल्या खांद्यावर घेतली पाहिजे. यात सर्व नियोक्ते-व्यवस्थापक, पर्यवेक्षक आणि कामगार यांचे प्रशिक्षण समाविष्ट असले पाहिजे- ज्यात कार्यस्थळावरील घरगुती हिंसाचाराबद्दल, तसेच यांत बळी पडणार्यांचे संरक्षण व त्यांना आधार व विशिष्ट नियम आणि

संसाधने समाविष्ट असली पाहिजेत जी यशस्वी नियोक्ता-अधिष्ठित उपक्रमांवर आधारित असली पाहिजेत.

संघटनांनी देखील घरगुती हिंसाचाराची दखल घेत त्याच्या गांभीर्यास प्राधान्य दिले पाहिजे. घरगुती हिंसाचार ही संघटनांशी संलग्न बाब आहे आणि या कामात महिला संघटना नेत्यांनी नेतृत्व केले पाहिजे. हिंसाचारापासून दूर जाण्यासाठी, महिलांना आर्थिक स्वातंत्र्य असणे गरजेचे आहे आणि त्यांना नीट आधार देण्यात आला नाही तर यातून बचाव झालेल्यांना आपली नोकरी आणि काही वेळा तर त्यांचा जीव गमावण्याचा धोका असतो. घरगुती हिंसाचारास सामोरे गेल्यानंतर, आपली नोकरी गेली असे एक चतुर्थांश प्रतिसादकर्त्यांनी सांगितले.महिलांचा घरगुती हिंसाचारापासून बचाव करण्यासाठी आवश्यक असणारे, नोकरीचे संरक्षण व आर्थिक स्वातंत्र्य यांत संघटनांची भूमिका मोठी आहे.

घरगुती हिंसाचाराचा कार्यस्थळावरील दुष्परिणाम या सहित त्या बद्दल माहिती, जागरूकता वाढवणे आणि घरगुती हिंसाचारास आळा घालण्यासाठी मोहिमा यांत संघटनांनी सक्रियतेने भाग घेतला पाहिजे हे क्रमप्राप्त आहे. बेधुंद पुरुषीपणासभोवती व त्यास पुरस्कृत करणारे प्रस्थापित सामाजिक नियम बदलण्यासाठी संघटना आणि सामाजिक संस्थांनी प्रयत्न केले पाहिजेत आणि घरगुती हिंसाचार समाप्त करण्यासाठी पुरुष व महिला ट्रेड युनियन नेत्यांनी स्वत:स गुंतवून घेतले पाहिजे. संघटनांनी देखील यातून बचाव करून घेतलेल्यांना अग्रिम कृतीद्वारा आधार दिला पाहिजे, भ्रम आणि निरर्थक पूर्वप्रथांवर प्रश्नचिन्हे उभी केली पाहिजेत आणि हिंसाचारावर आळा घालण्यासाठी नियोक्ते व सरकारावर पुढील पाऊले उचलण्यासाठी दबाव वाढवला पाहिजे. यात कायद्यात सुधारणाचे समर्थन व प्रचार, पीडब्ल्युडीव्हीएममध्ये सुधारणा, आयएलओ कन्व्हेन्शन १० मध्ये तडजोडीची भाषा, आणि सामूहिक वाटाघाटी व धोरणात रेकमेंडेशन २०६ आणि सवेतन घरगुती हिंसाचार सुट्टी, कामाचे लवचिक तास, कार्यस्तळावर सुरक्षितता योजना आणि गैरफायद्यांची तक्रार केली म्हणून बदल घेतला जाईल या विरुध्द आश्वासन समाविष्ट आहेत.

हे सामूहिक सामाजिक आव्हान आहे; असे आव्हान जिथे सकारात्मक परिवर्तन घडू शकेल- जे यातून बचाव होणार्यासाठी, हिंसा करणार्यांसाठी आणि नियोक्त्यांसाठी-हे कार्यस्थळ आहे. हिंसाचाराविरुध्द कार्यस्थळाची प्रतिक्रिया सुधारण्यासाठी विधायक, नियोक्ते, संघटना आणि वकील यांच्या कडून बहु-दिश प्रयत्नांची गरज आहे, त्यांनी समाजातील योग्य सहकार्यांसोबत सहकार्य करत काम करणे आवश्यक आहे; बचाव झालेल्यांना आधार देण्यासाठी आणि हिंसाचार करणार्यांचे वर्तन बदलण्यासाठी. या सर्व कामांत महिलांना समाविष्ट करणे अत्यंत गरजेचे आहे.

## Research led by:

## Supported by: